सायं.दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
Mo-9422404740

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | द्विभाषिक | वर्ष ०२ | अंक - १४२ | शनिवार, दि.३१ मे २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 | Issue - 142 | Saturday, Dt.31 May 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4




# अरेबियन ज्वेलर्सला सहकार्य करणारे आणि तिथे काम करणाऱ्या टीमवर गुन्हा दाखल करा !

## बंगाली बाबू पळून गेल्याचे माहित असतानाही कर्मचाऱ्यांनी ऑनलाइन पेमेंट वसूल केले

विश्वनायक न्यूज

अरेबियन ज्वेलर्स चा मालक बंगाली बाबू हा बीड मधील गोरगरीब लोकांची लाखो रुपयांना फसवणूक करून पळून गेल्याची चर्चा होत आहे. मात्र या प्रकरणात केवळ अरेबियन चा मालकच जबाबदार नाही तर त्याला सहकार्य करणारे पार्टनर आणि त्याच्या शॉप मध्ये काम करणारे कर्मचारी सुद्धा तेवढेच जबाबदार आहेत. दोन महिन्यापूर्वीच मालक पळून गेल्याची माहिती असताना सुद्धा कर्मचाऱ्यांनी वसुली सुरूच ठेवली आणि त्या दरम्यान हजारो लोकांची फसवणूक करीत लाखो रुपये जमा केले.

### तक्रार आल्याच्या काळामधील पोलीस अधिकार्याचे सीडीआर तपासा

अरेबियन्स ज्वेलर्स मालकाच्या विरोधात सुरुवातीला आणि नंतरच्या काळामध्ये सुद्धा तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. त्या तक्रारी कोणत्या पोलीस ठाण्यात झाल्या, कोणत्या अधिकाऱ्याने त्याचा तपास केला, त्या तपासातून काय निष्पन्न झाले आणि याबाबत काय कार्यवाही केली या सगळ्यांचा तपास होण्याची गरज आहे. यासाठी तक्रार आल्याच्या काळामध्ये संबंधित पोलीस अधिकाऱ्याचे सीडीआर तपासावे लागतील. पोलीस ठाण्याचे कॅमेरे जरी शोधले तरी कोण कोण येऊन भेटले हे सुद्धा लक्षात येईल. तक्रारदाराकडे तक्रार केल्याच्या सगळ्या तारखा आणि वेळ याबाबतचे पुरावे आहेत. त्या अनुषंगाने हा सगळा तपास झाला पाहिजे आणि यामध्ये जो कोणी दोषी अधिकारी सापडेल, त्यावर एसपी साहेबांनी कठोर कारवाई केली पाहिजे.





### काही ज्वेलर्सचीही फसवणूक झाल्याची चर्चा

अरेबियन ज्वेलर्स वाल्याने मोठा गाजावाजा करून, शो चा देखावा करीत बीड मधील प्रतिष्ठित लोकांच्या हस्ते सुरुवातीचे काही लकी ड्रॉ काढून सर्वसामान्यांना आकर्षित करून त्यांना फसविले. यामध्ये केवळ ग्राहकच नाही तर काही ज्वेलर्सची सुद्धा फसवणूक झाली असल्याचे समोर येत आहे. फसवणूक झाल्यानंतर एका ज्वेलर्स मालकाने बीड शहर पोलीस ठाण्यात तक्रारी अर्ज सुद्धा दाखल केला आहे. यावर पोलीस सध्या तपास करीत असून, हा तपास नेमका कधी पूर्ण होणार याबाबत चर्चा होत आहे.

### ग्राहकांना क्यूआर कोड पाठवून लुबाडणूक

अरेबियन ज्वेलर्स चा मालक बऱ्याच महिन्यापूर्वी शहरातून निघून गेला होता अशी चर्चा आहे. लोकांना याबाबत संशय आल्याने त्याबाबतची चर्चाही होत होती. मात्र दुसरीकडे काम करणारे कर्मचारी हे लकी ड्रॉ चे सदस्य झालेल्या ग्राहकांना सातत्याने पैशाची मागणी करत होते. जेव्हा जेव्हा ग्राहकांनी मालकावर संशय व्यक्त केला त्या त्या वेळी या कर्मचाऱ्यांनी मालकाबद्दल शंका घेऊ नका असे म्हणत, लकी ड्रॉ निघणार असल्याचे सांगत पैशाची मागणी केली. यासाठी त्यांनी क्यू आर पाठविला आणि त्यावर ऑनलाईन पेमेंट घेतले. याबाबतचे सगळे रेकॉर्ड अनेक ग्राहकाकडे उपलब्ध आहेत. माहिती असूनही ग्राहकाकडून पैसे घेणे ही एक प्रकारची लुबाडूनुकच आहे. त्यामुळे असे पैसे घेणारी यामध्ये दोषी ठरतात.

### अरेबियन विरोधात तक्रार आल्यानंतरही तडजोड करणारा तो पोलीस अधिकारी कोण ?

याबाबत अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली असून, याबाबत सर्व ग्राहक आणि सबंध शहरांमध्ये चर्चा होत आहे. अरेबियन जबरदस्त च्या मालकाबाबत संशय व्यक्त करीत, काही जणांनी संबंधित पोलीस ठाण्यात तक्रारी अर्ज दाखल केला होता. यावेळी तिथे असलेल्या पोलीस अधिकाऱ्याने चौकशीला सुरुवातही केली होती. मात्र अरेबियन ज्वेलर्सचा मालक आणि त्याचे काही साथीदार संबंधित पोलीस अधिकाऱ्याला जाऊन भेटले आणि त्यांनी त्यांच्या पद्धतीने त्या अधिकाऱ्याला पटवले. त्यामुळे या तक्रारी अर्जाचा विचार त्या अधिकाऱ्यांनी केलाच नाही. असे सांगितले जात आहे की संबंधित पोलीस अधिकाऱ्याने अरेबियन्स वाल्याशी आर्थिक संधान साधून, तडजोड केली. या तडजोडीमुळेच अरेबियन्स वर कारवाई झाली नाही आणि लोकांची फसवणूक झाली. त्यामुळे तो अधिकारी कोण आणि त्याने कोणत्या प्रकारची तडजोड केली शिवाय त्याने तक्रारी अर्जाबाबत काय चौकशी केली याबाबत संपूर्ण तपास पवा अशी अपेक्षा फसवणूक झालेल्या गोरगरीब ग्राहकांकडून होत आहे.

### एसपी कॉवत साहेब यांनी पारदर्शक चौकशी करावी

ज्यावेळी अरेबियनच्या बाबतीत तक्रारी करण्यात आल्या होत्या, त्यावेळी जिल्ह्याला दुसरेच पोलीस अधीक्षक उपलब्ध होते. त्यांचा या प्रकरणांमध्ये काय रोल होता हे माहीत नाही मात्र त्यावेळी करण्यात आलेल्या तक्रारीच्या तपासाचे काय झाले, याची चौकशी सध्या जिल्ह्यात कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पारदर्शकपणे करावी, अशी अपेक्षा जनतेतून व्यक्त होत आहे. एस पी साहेबांनी जिल्ह्यातील अनेक प्रकरणांचा छडा लावला आहे त्यामुळे याच्याही खोलाशी ते जातील अशी अपेक्षा आहे.

### पोलिसांच्या निष्काळजीपणामुळेच चालक महबूब रहेमान फरार – सचिन उबाळे

बीड जिल्ह्यामधील गोरगरिबांची अनेक बँका आणि पतसंस्थांच्या माध्यमातून आजपर्यंत फसवणूक झालेली आहे. ज्ञानराधापासून ते साईराम आणि इतर पतसंस्थांनी गोरगरीब जनतेच्या ठेवी बुडविल्या आहेत. अशा गोरगरीब जनतेसाठी सचिन उबाळे हे सातत्याने आवाज उठवित आहेत. अरेबियन ज्वेलर्सच्या बाबतीतही त्यांनी पोलिसांकडे तक्रार करून अशा लोकांना लकी ड्रॉ काढण्यास परवानगी देऊ नका अशी मागणी केली होती. मात्र याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यानंतरही काही ग्राहकांनी तक्रारी दाखल केल्या मात्र त्याकडेही दुर्लक्ष केले गेले. यावर बोलताना सचिन उबाळे म्हणाले की,

पोलिसांना याबाबत सगळी कल्पना दिलेली होती, नंतरही काही तक्रारी झाल्या मात्र पोलिसांनी दुर्लक्ष केले. पोलिसांच्या निष्काळजीपणामुळेच अरेबियन ज्वेलर्स चा मालक महबूब रहेमान हा पळून जाण्यात यशस्वी ठरला. पोलिसांनी वेळीच काळजी घेतली असती तर या मालकावर लक्ष ठेवता आले असते. मात्र तक्रारी दाखल होऊन सुद्धा पोलीस निष्काळजी राहिले आणि त्याचाच फायदा या मालकाने घेतला.



यासाठी ग्राहकाला क्यू आर कोड नंबर पाठवून ऑनलाइन पैसे मागितले गेले. यामुळे यात दोषी असलेल्या सगळ्यांवर कारवाई होण्याची गरज असून त्यांच्यावरही गुन्हा दाखल करावा अशी मागणी असंख्य ग्राहकांनी केली आहे.

अरेबियन ज्वेलर्सच्या बंगाली बाबू मालकाने बीड शहरामध्ये मोठा गाजावाजा करीत अरेबियन ज्वेलर्सच्या नावाखाली शाखा उघडली. यामध्ये लकी ड्रॉ काढून ग्राहकांना मोठमोठे बक्षीसाच्या आधारावर आकर्षित केले. चार चाकी पासून दुचाकी आणि टू बीएचके फ्लॅट असे अमिषा दाखविण्यात आले. सुरुवातीला या मालकाने चमकधमक कार्यक्रमाचे आयोजन करताना, शहरातील प्रतिष्ठित लोकांना सोबत घेतले. मोठमोठ्या ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन केले आणि त्यातून प्रसिद्ध केली. सुरुवातीच्या दोन लकी ड्रॉ मध्ये चार चाकी आणि दुचाकी ज्यात बुलेट चा समावेश आहे, त्याचे अत्यंत चांगल्या पद्धतीने वितरण केले. याशिवाय प्रतिष्ठित लोकांच्या माध्यमातून प्रसिद्धी करून घेतली. अनेक लोकांनी कसलाही विचार न करता त्याला मदत केली. सुरुवातीचे काही नक्की ड्रॉ काढल्यानंतर ग्राहकांची संख्या वाढत गेली. लोक पैसे भरत गेले आणि नंतरचे लकी ड्रॉ लांबत गेले. अलीकडच्या काळामध्ये चार महिन्यांपासून अरेबियन ज्वेलर्सचा मालक निघून गेल्याची चर्चा रंगू लागली. मात्र मालक येथेच असल्याचा विश्वास देत अरेबियन ज्वेलर्स मध्ये कामाला असलेल्या कर्मचाऱ्यांनी लोकांकडून वसुली सुरूच ठेवली. यासाठी ग्राहकांना क्यूआर कोड पाठविला जात होता. ज्यावेळी ग्राहकांनी मालकाबाबत संशय व्यक्त करीत अधिक चौकशी केली त्यावेळी मालक इथेच बसून आहेत, अगदी आमच्या शेजारी बसले आहेत त्यामुळे काळजी करू नका असे उत्तर संबंधित कर्मचाऱ्यांनी दिले. यावर विश्वास ठेवत ग्राहकांनी ऑनलाईन पैसे टाकले. म्हणजे मालक इथे नसल्याचे माहित असताना सुद्धा कर्मचाऱ्यांनी वसुली सुरूच ठेवली, त्यामुळे हे सगळे कर्मचारी यामध्ये दोषी असल्याचे स्पष्ट होते. याशिवाय ज्या ज्या लोकांना अरेबियन जवलर्सचा बंगाली बाबू गायब झाल्याचे माहित होते त्यांनीही तोंड उघडले नाही. या लोकांना या बंगाली बाबू कडून काय मिळत होते किंवा मिळाले याबाबत आता चर्चा होत आहे. जर या लोकांनी आणि कर्मचाऱ्यांनी वेळीच सावधानता बाळगली असती आणि ग्राहकांना सतर्क केले असते तर अनेक गोरगरिबांचे पैसे वाचले असते. मात्र ही सगळी माणसे बंगाली बाबूच्या गैर कृत्याला बळी पडली आणि लोकांची फसवणूक मोठ्या प्रमाणात झाली. यामुळे त्यांच्याशी निकटवर्ती असलेले आणि कर्मचारी म्हणून ज्यांनी काम केले त्या सर्वांची चौकशी होण्याची गरज असून, त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा अशी सबंध ग्राहकांची मागणी आहे. सध्या कर्तव्यदक्ष असलेले पोलीस अधीक्षक नवनीत कोवत यांनी याबाबत पुढाकार घेऊन, मुळापासून चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

## हेमंत पिंपळगावकर यांचा सेवानिवृत्ती कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषद अंतर्गत लघु पाटबंधारे विभागातील जलरत्न आणि अतिशय शिस्तप्रिय कार्यकारी अभियंता म्हणून ज्यांची ख्याती अखख्या बीड जिल्ह्यामध्ये आहे असे अतिशय शांत आणि संयमी आणि कर्तव्यदक्ष यांनी आपल्या कार्यकाळामध्ये अनेक लोकांचे मन जिंकले असे शिस्तप्रिय कार्यकारी अभियंता म्हणून सर्वत्र बीड जिल्ह्यामध्ये प्रसिद्ध असलेले असे जलरत्न मा श्री हेमंत जी पिंपळगावकर साहेब यांचा सेवानिवृत्त कार्यक्रम बीड शहरातील एका नामांकित हॉटेल येथे संपन्न झाला या वेळी बीड जिल्ह्यातील तसेच बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक वकील्स डॉक्टर इंजिनिअर्स पत्रकार तसेच जिल्हा परिषदेतील नंबर दोन नंबर २ चे कार्यकारी अभियंता विजय जी सपकाळे साहेब तसेच बीड जिल्हा ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता मुकुंद जी आंधळे साहेब तसेच माजी कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद एक चे संजय जी पवार साहेब सह जिल्हा परिषदेतील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते मा हेमंत पिंपळगावकर साहेब यांच्या कार्याचा जर विचार केला तर शब्दात व्यक्त



करणे देखील शक्य नसल्याचे मान्यवरांकडून त्यांना भावी आयुष्यासाठी मनस्वी शुभेच्छा देताना विचार व्यक्त करण्यात आले याच पार्श्वभूमीवर हेमंत पिंपळगावकर साहेबांनी केलेल्या अतिशय उत्कृष्ट कर्तब्याच्या दखल घेत महाराष्ट्र मध्ये अग्रेसर असलेला पत्रकार संघ म्हणजेच लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष मा श्री बीबी वैद्य साहेब यांनी पिंपळगावकर साहेब यांची प्रत्यक्षात भेट घेऊन त्यांनी केलेल्या उत्कृष्ट जिल्हा परिषद अंतर्गत लघु पाटबंधारे विभागाअंतर्गत केलेल्या कर्तव्याचे कौतुक करून त्यांना भावी आयुष्यासाठी लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने मनस्वी शुभेच्छा दिल्या या वेळी उपस्थित असलेले लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर तसेच बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक अधिकारी कर्मचारी वकील डॉक्टर इंजिनिअर पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते .



बीड जिल्ह्याच्या आम आदमी पार्टीच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे शहराध्यक्ष सय्यद सादेक शहर सचिव मिलिंद पाळणे अल्पसंख्याक विभाग प्रमुख रफिक पठाण रामभाऊ शेरकर विल्सन कांबळे इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# अनिल जाधवर एक दिपस्तंभ- डॉ.विक्रम सारुक

बीड (प्रतिनिधी ) जिल्हा परिषद शाळा गांधीनगर कार्यरत असणारे अनिल जाधवर पदवीधर शिक्षक तथा राज्य अध्यक्ष कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघ हे नियत वयोमानानुसार ३१ मे २०२५ अखेर सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवा कार्याचा गौरव करण्यासाठी सेवागौरव सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २९ मे २०२५ रोजी हॉटेल निलकमल बीड येथे सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न झाला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय पंचगल्ले शिक्षणाधिकारी (योजना) हे होते तर प्रमुख पाहुणे सुरेश केंद्रे लेखा व वित्ताधिकारी, ड सर्जेराव (तात्या) तांदळे जिल्हा सरचिटणीस भाजपा, दादासाहेब मुंडे कॉग्रेस महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस, भगवान फुलारी शिक्षणाधिकारी प्राथमिक, डॉ.विक्रम सारुक प्राचार्य डायट,उपशिक्षणाधिकारी उध्दव सांगळे धाराशिव, भाऊसाहेब सानप प्राध्यापक एमबीए झील कॉलेज पुणे, समंदर खान गटशिक्षणाधिकारी बीड , जमीर शेख गटशिक्षणाधिकारी शिरुर (का), सिध्देश्वर माटे विस्तार अधिकारी, ड महेश गर्जे, डॉ.राजीव घुगे, डॉ.संध्याताई घुगे, डॉ.पी.सी.तांबडे, अनिलकुमार होळकर सिने प्रोडयुसर, मिनाक्षीताई होळकर पार्श्वगायिका, श्रीराम बहीर चेअरमन शिक्षक पतसंस्था बीड, विष्णू खेत्रे चेअरमन शिक्षक पतसंस्था गेवराई, मारुती पठाडे, चेअरमन शि.प.सं.आष्टी, दिलीप खाडे सचिव शि.प.सं.पाटोदा, श्री सानप चेअरमन शि.प.सं. शिरुर (का), प्रशासन अधिकारी अनंता खेडकर, प्रवीण येवले, दैनिकाचे उपसंपादक नारायण नागरे नाना, नितिन क्षीरसागर, संघटनेचे नेते सुर्यकांत जोगदंड, नामदेव शिंदे, हरीदास घोगरे, सुरेश ढास, भगवान पवार, उनवणे सर, राजेंद्र लाड, सोन्याबापू शेंडगे इ.उपस्थित होते.




श्री अनिल जाधवर पदवीधर शिक्षक पदावर जिल्हा परिषद शाळा गांधीनगर (मराठी) बीड केंद्र अशोक नगर तालुका बीड येथे कार्यरत होते. ज्ञानादानासारख्या पवित्र अशा शिक्षण क्षेत्रामध्ये जाधवर यांची प्रदिर्घ अशी ३८ वर्षे सेवा घडली. सेवाकालवधीमध्ये कर्तव्य परायणता, तत्पुरता, शिस्त व निटनेटकेपणा संस्कार क्षम गुणवत्ता पूर्ण शिक्षण हे त्यांच्या सेवेचे वैशिष्टये होते. संघटनेच्या वतीने सेवागौरव सन्मानपत्र देऊन जाधवर यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. ज्ञानदानाचे कार्य करत असतानाच कास्ट्राईब संघटनेमध्ये २५ वर्ष एवढा कालावधी संघटनेच्या विविध पदावर राहून शिक्षक व कर्मचाऱ्यांना न्याय दिला. प्रशासनाला वेळोवेळी धारेवर धरले. प्रशासनाबरोबर कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी आयुष्यभर संघर्ष केला. जिथे कमी तिथे आंम्ही हे सुभाषित जाधवर यांच्यासाठी निश्चित शोभते. निवृत्ती वेळी जाधवर हे कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाच्या राज्यअध्यक्षपदी विराजमान असून आता ते राज्यस्तरावर व मंत्रालय पातळीवर शिक्षक व कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्याचे त्यांचे कार्य प्रशंसनीय असून ते एक प्रकारचे शिक्षकांसाठी दिपस्तंभाचे कार्य करतात असे विधान प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना प्राचार्य डॉ.विक्रम सारुक यांनी केले.

सेवाकालावधीमध्ये जाधवर यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक कार्यामुळे त्यांना विविध पुरस्कार मिळाले. त्यामध्ये प्रामुख्याने जिल्हा परिषद बीडचा आदर्श शिक्षक पुरस्कार, मुलींची उत्कृष्ट पटनोंदणी जि.प.पुरस्कार, उत्कृष्ट कर्मचारी जनगणना कार्य भारत सरकारचा पुरस्कार याशिवाय अनेक पुरस्कार मिळाले.

त्यामुळे त्यांच्या कार्याची व सेवेची दखल घेऊन कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघ व केंद्रिय शाळा अशोकनगर यांच्या संयुक्त विद्यामाने सेवापूर्ती गौरव सोहळयाचे आयोजन केले. केंद्रप्रमुख हकीम मनियार, केंद्रीय मुख्याध्यापिका कमलताई लांडगे यांनी सत्कार आयोजनामध्ये सहकार्य केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाऊसाहेब हंगे यांनी केले सुत्रसंचालन प्रसिध्द सुत्रसंचालक महादेव इनकर यांनी केले. विशेषत: कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वीततेसाठी परिश्रम घेतले. स्वागतगित व गितगायन सिने पार्श्वगायिका मिनाक्षीताई होळकर यांनी केले. सिने प्रोडयूसर अनिलकुमार होळकर यांनी समयोचित काव्य सादर केले. या कार्यक्रमास शिक्षण क्षेत्रातील अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, राजकीयनेते,डॉक्टर,वकील, पत्रकार बांधव, चुंब गावचे प्रतिष्ठित नागरीक, नातेवाईक, मित्रपरिवार मोठया संख्येने उपस्थित होते. समन्वयकाची भूमिका प्रकाश अहिरे व भगिरथ मस्के यांनी पार पाडली व सोमनाथ तांदळे, संजय दराडे, मच्छिंद्र राख, द.ल.वारे, बाळासाहेब सिरसाट यांनी मोलाचे सहकार्य केले तर आभार रविंद्र सुतार यांनी मानले.

# अशोक रसाळ यांच्या बालाघाट मंडळामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

( मांजरसुंबा प्रतिनिधी) ३० मे रोजी बीड बालाघाट मंडळ आयोजित मंडळाध्यक्ष अशोक रसाळ यांनी स्वच्छता मोहीम अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन व शिवमंदिर येथे आरती करून अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती उत्साहात साजरी केली,अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या राजकीय जीवनात अनेक मंदिराचा जिर्णोद्धार केला शिव मंदिरे उभारली त्यांचे पुनः निर्माण केले अनेक शिव मंदिरांचा जीर्णोद्धार केला हे योगदान कधीही न विसरण्यासारखे आहे अहिल्यादेवी होळकर यांच्या स्त्रीशताब्दी जन्मोत्सवानिमित्त बालाघाट मंडळातर्फे निसर्गाच्या सानिध्यात असलेले श्री क्षेत्र कपिलधार येथे मन्मथ स्वामी यांच्या समाधीने पवित्र असलेले अनेक राज्यांमध्ये या देवस्थानचे नावलौकिक आहे आज येथेच भारतीय जनता पार्टी तर्फे स्वच्छता मोहीम शिव आरती व अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला यानिमित्त यावेळी कार्यक्रमास प्रमुख उपस्थित म्हणून भाजप जिल्हाध्यक्ष शंकर भाऊ देशमुख भाजप संघटन सरचिटणीस नागरगोजे सर हे उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजक बालाघाट मंडळाचे अध्यक्ष अशोक रसाळ यांनी कार्यक्रमाचे सुंदर नियोजन केले होते यावेळी देवस्थानचे पुजारी डॉ. प्रशांत स्वामी,भाजपा अनुसूचित मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर, अल्पसंख्यांक मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष सलीम जहागिरदार, युवा नेते आप्पासाहेब झोडगे,चौसाळा सर्कल प्रमुख बप्पासाहेब हावळे, विनोदराव काळासे, उदंड वडगाव ग्रा. प.सदस्य नवनाथ चव्हाण, तांदळवाडी चे बुथ प्रमुख नामदेव आबा खोसे, मांजरसुंबा प्रमुख दत्ता रसाळ, पवन कोकाटे, तुषार लाड, अनुरथ कोकाटे, ओमकार रसाळ, दत्ता वाघेरे गणेश, वाघिरे दीपक, वाघिरे ओंकार रसाळ, पवन रसाळ, रितेश सुरवसे, गणेश थोरबोले, वसंत रसाळ, व इतर अनेक जण या कार्यक्रमात सहभागी झाले व उत्साहाने मंदिरामध्ये स्वच्छता करण्यात आली त्यानंतर अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करून शिव मंदिरात महाआरती करण्यात आली

यावेळी आयोजक मंडळ अध्यक्ष अशोक रसाळ यांनी सर्वांचे मनापासून आभार मानले बालाघाटावरील यावेळी अनेक तरुण व ज्येष्ठ सहभागी झाले होते




# पाटोद्यात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त शोभायात्रेचे जल्लोषात स्वागत



पाटोदा / फैयाज सय्यद

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त मालेगाव (जि. नांदेड) येथून निघालेली शोभायात्रा आज पाटोदा तालुक्यात मोठ्या उत्साहात दाखल झाली. गावातील नागरिकांनी फुलांची उधळण,पिवळ्या ध्वज आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात शोभायात्रेचे जोरदार स्वागत केले.शोभायात्रा पाटोदा शहरात दाखल होताच गावात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले. जयघोष, ढोल-ताशा, आणि श्रद्धेने ओतप्रोत कार्यक्रम यामुळे संपूर्ण परिसर उत्साहाने भारून गेला होता. गावकऱ्यांनी राजमातांना मनःपूर्वक अभिवादन करत इतिहासातील या तेजस्वी अधिष्ठानाचे स्मरण केले.ही यात्रा दरवर्षीप्रमाणे चौंडी, जिल्हा अहिल्यानगर येथे पोहोचणार आहे. चौंडी ही राजमातांची जन्मभूमी असून, त्या स्मृतिस्तंभावर दरवर्षी राज्यभरातून यात्रा येते.अहिल्यादेवींच्या कार्याचा जागर आणि त्यांच्या आदर्श शासनव्यवस्थेचा प्रसार हाच या यात्रेचा उद्देश आहे.यात्रेच्या स्वागतासाठी ग्रामस्थ, युवक आणि विविध सामाजिक कार्यकर्ते व नेत्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून अहिल्यादेवींच्या जीवनकार्याचा गौरव केला.राजमातांचा आदर्श समाजघडणीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे जीवन म्हणजे सेवा, न्याय आणि त्याग यांचे प्रतीक आहे,

असे मत प्रमुख मान्यवरांनी व्यक्त केले.

# बिंदुसरा नदीला पुरस्थिती निर्माण होण्याची शक्यता

बीड:- ( दि.३० )यावर्षी मान्सुनपुर्व झालेल्या अतिवृष्टीमुळे बिंदुसरा धरण पुर्ण क्षमतेने भरून ओसंडून वाहू लागले आहे.येत्या पावसाळ्यात पावसाची आवक वाढल्यानंतर बिंदुसरा नदीला पुरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असुन दि.२३ जुलै १९८९ सारखा बिंदुसरा नदीला महापुर येऊन ३५ वर्षांपूर्वी घडलेली दुर्दैवी घटना घडु शकते.नदीकाठच्या वस्तिंना मोठ्या प्रमाणात हानी पोहोचली होती.गेल्या ३ वर्षांपासून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड, युनुस शेख,सुदाम तांदळे यांनी वारंवार लेखी निवेदन तसेच आंदोलनाद्वारे बिंदुसरा नदीपात्रात भुमाफियांचे अतिक्रमणाचे प्रमाण वाढलेले असुन नगरपरिषद प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाचा याला छुपा पाठिंबा असुन नदीपात्रात कच-याचे ढीग, भर घालुन त्यावर प्लाटींग करणे, रस्ते बनविणे, बांधकाम करणे असे सर्रास प्रकार आढळून आले. संबंधित प्रकरणात विभागीय आयुक्तांकडे लेखी तक्रार केल्यानंतर त्याअनुषंगाने सहाय्यक आयुक्त गट अ नगरपरिषद प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद डॉ.निलम पाटील यांनी दि.२९ मे आणि दि.२८ जुन २०२३ अशा २ वेळा मुख्याधिकारी नगरपरिषद बीड निता अंधारे यांना बिंदुसरा नदीपात्रात भराव घालून नदीपात्राचे मैदान करून ओढे चक्क बुजवुन नदीचा प्रवाह वळवुन करण्यात आलेल्या अनाधिकृत बांधकाम प्रकरणी ठोस कारवाई करण्याचे आदेश देऊनही मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांनी आणि जिल्हा प्रशासनाने जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे भविष्यात जर बिंदुसरा नदीला आलेल्या पुरामुळे जिवितहानी अथवा वित्तहानी झाली तर याला सर्वस्वी नगरपरिषद प्रशासन आणि जिल्हा प्रशासन जबाबदार असणार आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणात फौजदारी कारवाई आणि नुकसान भरपाई जबाबदार अधिकाऱ्यांकडून घेण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि रामनाथ खोड यांनी केली आहे.पुराचा धोका ओळखून उपाययोजना करण्यापेक्षा भुमाफियांची तळी उचलण्यात नगरपरिषद आणि जिल्हा प्रशासनाने धन्यता मानली :- डॉ.गणेश ढवळे



१९८९ चा बिंदुसरा नदीला आलेला पुराचा मागील अनुभव पाहता नगरपरिषद प्रशासन, जिल्हा प्रशासन आणि पाटबंधारे विभाग यांना वारंवार पुर नियंत्रण रेषा ( निल रेषा,लाल रेषा) आखणी करण्यात यावी. संरक्षक भिंतीचा अभाव, नदीपात्रात व शेजारी अनेक अतिक्रमित ईमारतीची बांधकामे करण्यात आलेली आहेत.तर फुलाई नगर मधील बिंदुसरा नदीपात्रात सिमेंटची भिंत बांधून नदीचा प्रवाह वळविण्यात आलेला आहे आणि संबंधित प्रकरणात वारंवार तक्रारी व आंदोलनानंतर सुद्धा नगरपरिषद व जिल्हा प्रशासन आपापले स्वार्थ साधून भुमाफियांशी संधान बांधून आहेत त्यामुळे आज बीडकरांचा जीव टांगणीला लागलेला असल्याची उद्विग्न प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

# पाटोदा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

## विद्यार्थी व पालकांचा उस्फुर्त प्रतिसाद

पाटोदा / फयाज सय्यद

पाटोदा तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पाटोदा तालुक्यातील दहावी व बारावी परीक्षेत विशेष प्राविण्यासह यश संपादन करणाऱ्या तब्बल ५१ विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह सत्कार करण्यात आला

पाटोदा रेणुका माता मंदिर येथील सभा मंडप येथे दिनांक ३० मे शुक्रवार रोजी सकाळी ११ वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वसंतराव नाईक विद्यालयाचे प्राचार्य तुकाराम तुपे सर होते तर प्रमुख पाहूणे म्हणून उपविभागीय अधिकारी शेख वसिमा (मॅडम) नायब तहसीलदार सय्यद मुल्ला साहेब, पोलीस उपनिरीक्षक भडके

प्राचार्य नजीर पठाण, जेष्ठ पत्रकार छगन मुळे, राहुल शाहुराव जाधव, सय्यद शहाबाज, जेष्ठ सेवा निवृत्त शिक्षक दे.मा.जावळे, प्राचार्य राजेंद्र आविळे आधी उपस्थित होते. तालुक्यातील जवळपास १५ विद्यालयाचे एकूण प्रत्येकी तीन प्रमाणे जवळपास ५१ विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ तसेच

प्रशस्तिपत्र व स्मृतिचिन्ह

देऊळ गौरविण्यात आले आहे. विशेष म्हणजे यशस्वी विद्यार्थ्यांच्या पालकांचाही यावेळी सत्कार करण्यात आला

यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी शेख नसिमा यांनी सांगितले की यशस्वी विद्यार्थी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी मनाची तर चिकाटी पाळली पाहिजे जीवनातले आपले उद्देश ठेवा मात्र यामध्ये जर साध्य झाल्या जिद्दीने आणि अभ्यासातील चिकाटी तुम्हाला जरूर यशस्वी केल्या शिवाय रहाणार नाही.आपण आपल्या इच्छित स्थळी पोचू शकतो सोबतच त्यांनी या संदर्भात अनेक यशस्वी विद्यार्थ्यांची उदाहरणे दिले

यावेळी प्राचार्य तुकाराम तुपे यांचीही अध्यक्षस्थानी होते अध्यक्षीय भाषणात बोलताना तुकाराम तुपे यांनी सांगितले की विद्यार्थ्यांवर पालकांनी सतत लक्ष ठेवण्याची अत्यंत आज काळाची गरज असल्याचे सांगून विद्यार्थी सुद्धा आपल्याला योग्य ठिकाणी जाण्यासाठी मेहनत व चिकाटी आणि ठेवण्यास आपले उद्दिष्ट साध्य करू शकतो असे सांगितले यांनी आपल्या आपल्या मार्गदर्शनपर भाषण

घेऊ कार्यक्रमा यशस्वी करण्यासाठी पत्रकार संघाचे जेष्ठ पत्रकार छगन मुळे, तालुका अध्यक्ष अजय जोशी जिल्हा उपाध्यक्ष कादर मकरानी ,संजय सानप, हमीदखान पठाण,जावेद शेख, अनिल गायकवाड ,पवन भोकरे, सचिन शिंदे, सय्यद फय्याज, सतिश गर्जे,सय्यद साजिद, दत्ता देशमाने, दिगंबर नाईकनवरे,आदींने परीश्रम घेतले

कार्यक्रमासाठी कार्यक्रमाची प्रस्ताविक प्रा. सचिन पवार यांनी केले सूत्रसंचालन कादर मकरानी तर आभार हमीदखान पठाण यांनी मानले,




# लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी ; गट प्रवर्तक महिलांचा सन्मान

लिंबागणेश:-( दि.३१) बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आज दि.३१ वार शनिवार रोजी कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव तर प्रमुख उपस्थिती म्हणून लिंबागणेशचे भुमिपुत्र नवनियुक्त पुरवठा निरीक्षक म्हणून बुलढाणा येथे कार्यरत असलेले प्रथमेश राजेभाऊ गिरे यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भिम टायगर ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले तर आभार प्रदर्शन ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी मानले. प्रमुख वक्ते म्हणून डॉ.गणेश ढवळे यांनी कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा जीवनपट उलगडताना मध्ययुगीन कालखंडात भारताच्या इतिहासात ज्या महान स्त्रिया होऊन गेल्या त्यांच्यामध्ये राजमाता जिजाऊ नंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे अद्वितीय स्थान असुन धार्मिक, सामाजिक आणि राजकीय कर्तृत्ववाने भारतभर त्यांनी मोठी किर्ती आणि नावलैकीक मिळवले.संपुर्ण भारतभर मंदिरे बांधणे,मंदिरांचा जीर्णोद्धार,नद्यांवर घाट बांधणे, पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी खोदणे, धर्मशाळा बांधणे, अन्नछत्रे चालवणे आदी लोककल्याणकारी कार्याच्या खुणा आजही भारतभर दिसून येतात.२४ मार्च १७५४ मध्ये पती खंडेराव यांना सूरजला जाट बरोबर कुंभेरी येथे झालेल्या लढाईत वीर मरण आले. तो काळ सती प्रथेचा होता. त्या काळात खंडेरायांच्या सोबत सती जाण्याचे नाकारून अहिल्यामाईंनी आपल्या पुरोगामित्वाचा परिचय दिला होता .आता अहिल्यामाईंनी धर्म,प्रथा, रूढी ,परंपरा या पलीकडे कर्तव्य महत्त्वाचे मानुन लोककल्याणासाठी जगण्याचा निर्धार केला. ज्या रूढी, प्रथा, परंपरा अंधाराकडुन प्रकाशाकडे नेतात त्याच आम्हाला मान्य आहेत अशी ठाम भूमिका घेतली. धार्मिक भावना जपत चुकीच्या पुढे परंपरांना छेद दिला. सतीप्रथा, हुंडाप्रथा, बालविवाह यास विरोध करत धर्म चिकित्सेला प्रारंभ करणाऱ्या अहिल्यामाईंचे विचार आणि कृती क्रांतिकारक आणि प्रेरणादायी होती.अहिल्यामाई होळकर यांनी महिला सशक्तीकरणावर विशेष भर दिला होता .विधवा स्त्रियांसाठी कायद्यात बदल केले. त्यांना मुल दत्तक घेण्याचा अधिकार, उदरनिर्वाहाकरीता पतीच्या संपत्तीत अधिकार मिळवून दिला. शिवाय दत्तक पत्रावर आकारला जाणारा नजराणा( कर ) रद्द केला. स्त्रीसक्षमीकरणाच्या दृष्टीने ही पावले क्रांतीकारक होती असे प्रतिपादन केले. यावेळी राजेभाऊ गिरे, अनंतकाका मुळे,उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, रमेश गायकवाड, समीर शेख, अशोक जाधव, सुरेश निर्मळ, युवराज गिरे, रामचंद्र मुळे,आदी उपस्थित होते.



ग्रामपंचायतीच्या वतीने पुरवठा निरीक्षक पदी नियुक्त प्रथमेश गिरे व गट प्रवर्तक सिमा वखरे व ज्योती गिरे यांचा सन्मान

लिंबागणेशचे भुमिपुत्र प्रथमेश राजेभाऊ गिरे यांची पुरवठा निरीक्षक पदी बुलढाणा येथे नियुक्ती झाल्याबद्दल शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याचवेळी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा गट प्रवर्तक सिमाताई वखरे व ज्योती गिरे यांचा ग्रामपंचायतच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सन्मान पत्र,रोख पाचशे रुपये आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

# डॉ.प्राची वंदन जाधव यांना केंद्रीय आयुर्वेदिक परिषद दिल्लीचीपी जी स्टार शिष्यवृत्ती

पाटोदा / फयाज सय्यद

पाटोदा येथील जयभवानी महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख प्रो.डॉ.वंदन जाधव यांची कन्या डॉ.प्राची वंदन जाधव या महात्मा गांधी आयुर्वेदिक महाविद्यालय व संशोधन केंद्र वर्धा जि.वर्धा येथे रसशास्त्र व भैषज्य कल्पना या विषयात एम.डी.चे शिक्षण घेत आहेत.केंद्रिय आयुर्वेदिक विज्ञान अनुसंधान परिषद नवी दिल्ली व आयुष्य मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांच्या कडून आयुर्वेदिक क्षेत्रातील देशभरातील १०० संशोधक विद्यार्थ्यांना पी.जी.स्टार शिष्यवृत्ती दिला जाते.२०२४-२०२५ या वर्षीची शिष्यवृत्ती डॉ.प्राची वंदन जाधव यांना घोषीत झाली आहे .त्यांचे बी.ए.एम.एस.पदवी पर्यंत चे शिक्षण श्री.छत्रपती शाहू महाराज आयुर्वेदिक महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथून पूर्ण झाले आहे. डॉ.प्राची वंदन जाधव यांना शिष्यवृत्ती मीळाल्या बद्दल त्यांचे शिवछत्र परिवार,बीड व जय भवानी महाविद्यालय, पाटोदा परिवाराकडून हार्दिक अभिनंदन व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा! देण्यात आल्या आहेत.पी.जी स्टार हा देशातील सर्वोच्च शिष्यवृत्ती मिळाल्याबद्दल डॉ.प्राची वंदन जाधव यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड - ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com